(पान ६ वरून)

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन संपन्न





चंद्रपूरचे कर्मचारी सुरक्षितता पथनाट्य सादर करतांना



वर्धापन दिनानिमित्त आयोजित आनंद मेळावा कार्यक्रमात च.म.औ.वि. केंद्राचे श्री.विजय सिंग व मंचावर उपस्थित वरिष्ठ अधिकारी व मान्यवर

या रौप्यमहोत्सवी उत्सवाला कोराडी थर्मल पॉवर स्टेशनचे मुख्य महाव्यवस्थापक मा.श्री.लक्ष्मीकांत कडाव यांची सन्माननीय उपस्थिती होती. संध्याकाळी ७ वाजता सुरू झालेला भव्य उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांसह मुख्य महाव्यवस्थापक श्री.विजयसिंह यांच्या अध्यक्षतेखाली सजलेल्या रंगमंचावर महाव्यवस्थापक श्री.कार्तिक वाघमारे, श्री.सिद्धार्थ वाघमारे, श्री.मदनसिंह चौहान, श्री.भरत यादव, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.हरिदास चौधरी, वर्धापनदिन समितीचे संयुक्त सचिव श्री.नरेंद्र राहाटे व समितीचे सचिव व कार्यक्रमाचे संचालक श्री.विलास बोझावार उपस्थित होते. दिपप्रज्वलन/ स्वागत गीत/ पुष्पगुच्छाने स्वागत केले. संदेश वाचन श्री.सुरेश रेवतकर अशा प्रारंभिक कार्यक्रमानंतर श्री.विजयसिंह यांनी सरत्या वर्षाचा आढावा घेत सर्व कर्मचारी व कुटुंबियांचे अभिनंदन करून रौप्यमहोत्सवी वर्धापन दिनाच्या व नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. विविध क्रीडा स्पर्धाचे बक्षिस वितरणचे संचलन श्री.अनिल कोठावडे यांनी केले. हा प्रेक्षकांचा व खेळाडूंचा उत्साहाचा विषय होता. रौप्यमहोत्सवानिमित्त एक स्मरणिका बनविण्यात आली आणि हया स्मरणिकेचे भव्य विमोचन याप्रसंगी करण्यात आले. कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांच्या सुप्तकला गुणांना वाव देण्यासाठी व २५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीचा मागोवा घेण्यासाठी केलेला हा उपक्रम यशस्वी ठरला. प्रमुख पाहुणे श्री.लक्ष्मीकान्त कडाव यांनी भाषणांत चंमऔविकें च्या वाढत्या आलेखिय कामगिरीचा उल्लेख करीत अभिनंदन केले. तांत्रिक क्षेत्रासोबतच सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्षेत्रात अग्रेसर असलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे अधिकारी, अभियंते व कामकारांचे कुटुंबिय यांच्या कामगिरीची स्तुती करीत शुभेच्छा दिल्या. संयुक्त सचिव नरेंद्र रहाटे यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाचा पूर्वार्ध संपला.

लगेच सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरूवात झाली. तीन रंगमंचावर एक साथ, विविध कार्यक्रम घेण्यात आले. सद्यपरिस्थितीवर व्यंग करणाऱ्या वऱ्हाडी कविता, ऊर्जानगरातील दोन्ही शाळांच्या सहभागाने सादर केलेले नृत्याविष्कार, कलावंतांनी सादर केलेले समूहगीते व द्वंद्व गीते, कामगार कलावंतांनी कामगारांच्या प्रश्नांवर व कॉलनीतील विविध घटनांवर आधारीत सादर केलेली व्यंग नाटिका, स्वीट डीश सांस्कृतिक कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरली. आकर्षक नेपथ्य मोहून घेणारी रंगमंच व्यवस्था नेत्रदीपक प्रकाश योजना, परिपूर्ण माईक सिस्टीम व कलावंतांनी मेहनतीने सादर केलेले विविध कार्यक्रमामुळे संपूर्ण कार्यक्रम आकर्षक झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता वेगवेगळया समित्यांचे प्रमुख सदस्य व कार्यकर्ते तसेच सर्व संघटनांच्या प्रतिनिधींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रर्माला सर्व अधीक्षक अभियंते अधिकारी आणि कर्मचारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी कामगार वर्ग व त्यांचे कुटुंबिय, कंत्राटदार कामगार इत्यादी साडेतीन ते चार हजार रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

## सार्वजनिक उपक्रम समिती मान्यवरांचे महानिर्मितीच्यावतीने स्वागत




महानिर्मितीचे श्री.सुभाष नेमाडे-महाव्यवस्थापक हे आमदार श्री.अमर काळे-सार्वजनिक उपक्रम समिती प्रमुख यांचे स्वागत करताना

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला वेस्टर्न कोलफिल्ड अंतर्गत घुग्गुस येथील कोळसा खाणीतून पुरविल्या जाणाऱ्या कोळशा संदर्भात अभ्यास दौरा नियोजित करण्यात आला. त्यानिमित्ताने दिनांक ३ व ४ फेब्रुवारी या कालावधीत वर्धा व चंद्रपूर या जिल्हयांच्या अभ्यास दौरा करण्याकरिता सार्वजनिक उपक्रम समिती (२००८-२००९) सदस्यांचे नागपूर येथे आगमन झाले. यामध्ये प्रामुख्याने समिती प्रमुख माननीय आमदार श्री.अमर काळे तसेच विधान सभा सदस्य सर्वश्री.अरविंद नेरकर, पी.यु. मेहता, शिवराम दळवी, नारायणराव गव्हाणकर, सुभाष चव्हाण इत्यादी सहभागी होते.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या नागपूर येथील उद्योग भवनात महानिर्मितीचे श्री.सुभाष नेमाडे-महाव्यवस्थापक यांनी श्री.अमर काळे-समिती प्रमुख तथा सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. याप्रसंगी महानिर्मितीचे श्री.अशोक पाटील-अधीक्षक अभियंता, श्री.एस.पी. रेखडे-अधीक्षक अभियंता, डॉ. भूषण शिंदे कार्यकारी अभियंता, श्री.संजीव गोतमारे-उप कार्यकारी अभियंता, श्री.ए.के. हिरूळकर-सहाय्यक अभियंता श्री.यशवंत मोहिते-जनसंपर्क सहाय्यक तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी तथा कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.